# प्रेसनोट

२०१९

गुन्हे शाखा, नवी मुंबई

**दिनांक ११.११.२०१९**

**गुंतवणूकदारांना कमी दिवसात जादा रक्कमेचा परतावा देण्याचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणुक करणा—या गुन्हेगारांना आर्थिक गुन्हे शाखेने जेरबंद करून बनावट गुंतवणूकदार संस्थांच्या फसव्या अमिषांना बळी पडु नये म्हणून पोलीसांनी केले आवाहन.**

मा. पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेने दिनांक ०७ नोव्हेंबर २०१९ रोजी वाशी सेक्टर ३० ए या ठिकाणी छापा घालून कॅपिटल कल्ब ट्रेडर्स या नावाने बनावट कंपनी चालवून कंपनीच्या www.capitalclub.in व www.cct.in.net या वेबसाईटवर तसेच रोख स्वरूपात पैसे स्विकारून कमी वेळात जास्तीत जास्त सोने चांदी व पैसे मिळवून देण्याची गुंतवणूक योजनेचे अमिष दाखवून गुंतवणूक करण्यासाठी लोकांना प्रोतसाहित करून ऑनलाईन व रोख स्वरूपात ४८४१ लोकांकडुन एकुण १४,५३,७७,५००/— रूपयांची गुंतवणूक स्विकारून गुंतवणूकदार लोकांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद केली आहे.

सदर गुन्हयातील आरोपी १. गणेश राजेंद्र शिंदे, (प्रवर्तक) २. अभिजीत सदाशिव जाधव,(एजन्ट) ३. समाधान नारायण चिंचोळे, (एजन्ट) ४. संजय विलास गवारे (एजन्ट) ५. बबन दिगंबर सदार, (एजन्ट) यांना अटक करण्यात आलेली आहे. आरोपी रविंद्र वसंतराव चौधरी(संचालक) हा फरार असुन वरील आरोपीविरूध्द वाशी पोलीस ठाणे येथे गु.रजि. नं. ३९४/२०१९, भादवि कलम ४२०, ४०९, ३४ सह द प्राईझ चीटस ॲन्ड मनी सर्क्युलेशन स्किम (बॅनींग) ॲक्ट १९७८ कलम ३, ४ व ६ तसेच माहिती व तंत्रज्ञान अधि. २००२ चे कलम ६६ (ड) सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तिय आस्थापना मधील हितसंबंधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम १९९९) चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन तपास आर्थिक गुन्हे शाखा कक्ष—१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. शाम शिंदे हे करीत आहेत.

माहे ऑक्टोबर २०१९ मध्ये ए. एम. पिक्चर्स नावाच्या बनावट गुंतवणूकदार कंपनीच्या विरूध्द अशाच प्रकारे या कायदार्गत कारवाई करण्यात आली होती. अशा प्रकारे वेगवेगळया बेकायदेशीर संस्था/कंपन्याच्या नावाने काही गुन्हेगार टोळया गुंतवणूकदारांना कमी कालावधी मध्ये जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करून फसवणूक करीत आहेत. तरी अशा प्रकारे या कंपनींच्या योजनांमध्ये असलेले पिडीत/गुंतवणूकदारांनी व अशा योजना बेकायदेशीरपणे जे हद्दीत चालु आहे तेथील नागरीकांनी आर्थिक गुन्हे शाखा कार्यालय दुरध्वणी क्रमांक ०२२/२७५७३०७१ यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

————————